**PRESS RELEASE**

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**RESERVE BANK OF INDIA**
**RBI On Internet:**
http://www.rbi.org.in
**Email: helpprd@rbi.org.in**

फेब्रुवारी ४, २००४

## निवासी व्यक्तींसाठी २५००० अमेरिकन डॉलरची उदारीकृत भरणा योजना

अधिक उदारीकरणासाठीच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून, निवासी व्यक्तींना कोणत्याही कारणासाठी दर कॅलेंडर वर्षामध्ये जास्तीत जास्त २५००० अमेरिकन डॉलर पर्यंत भरणा करण्याची परवानगी देण्यात येणार आहे व यासाठी सदर व्यवहार चालू खात्यावर आहे की भांडवली खात्यावर आहे, हा फरक करण्यात येणार नसून या संबंधीची एक योजना रिझर्व्ह बँकेने तयार केली आहे.

या योजनेतील सुविधांचा उपयोग करण्यास सर्व निवासी व्यक्ती पात्र आहेत. ही सुविधा कोणत्याही चालू अथवा भांडवल खात्यावरील, अथवा दोन्हींवरील कोणत्याही संमिश्र व्यवहारासाठी, प्रत्येक कॅलेंडर वर्षा मध्ये, जास्तीत जास्त २५००० अमेरिकन डॉलर पर्यंत भरणा करण्यास उपलब्ध आहे. या सुविधेनुसार निवासी व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगी शिवाय, भारता बाहेर कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा शेअर्स, किंवा इतर कोणतीही मालमत्ता विकत घेऊन स्वतः कडे ठेवण्यास स्वतंत्र आहेत त्याचप्रमाणे व्यक्तींना रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय, या योजने अंतर्गत भरणा करण्यासाठी, भारताबाहेरील एखाद्या बँकेमध्ये परकीय चलनातील खाती उघडता व सुरु ठेवता येतील. अशी परकीय चलनातील खाती या योजने अंतर्गत केलेल्या भरण्याशी संबंधित किंवा त्यामधून निष्पन्न झालेल्या सर्व व्यवहारांसाठी वापरता येतील.

या योजनेमधील सुविधा ही खासगी प्रवास, व्यवसायसंबंधी प्रवास, देणग्यांसाठीचा किंवा भेटीसाठीचा भरणा, अभ्यास, वैद्यकीय उपचार इ. साठी आधीच अस्तित्वात असलेल्या सर्व सुविधांच्या व्यतिरिक्त आहे. मात्र या सुविधेअंतर्गत केलेले भरणे हे 'फेमा' अन्वये बंदी असलेल्या किंवा मर्यादित असलेल्या कोणत्याही चालू खात्यावरील व्यवहारांसाठी, उदा. लॉटरी / स्वीप स्टेक्स खरेदी, अवैध म्हणून घोषित केलेल्या नियतकालिकांची खरेदी इ. साठी वापरता येणार नाहीत. या योजने अंतर्गत भूतान, नेपाळ, मॉरिशस अगर पाकिस्तान या देशांना, तसेच 'फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) ने 'असहकारी' म्हणून निवडलेल्या देशांना अगर भागांना, किंवा रिझर्व्ह बँकेने अलगपणे इतर बँकांना 'हाय रिस्क' म्हणून कळविलेल्या व्यक्तींना अगर संस्थांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रकमा पाठविता येणार नाहीत.

अर्जदारांनी अधिकृत विक्रेत्यांनी (एडी) बँकेला आपले पॅन क्रमांक कळवावेत व खात्री द्यावी, की भरणा करण्यात आलेला निधी हा त्यांच्या मालकीचा आहे. 'एडी' कडून अपेक्षा आहे की ही सुविधा देत असताना त्यांनी 'नो युअर कस्टमर' (केवायसी)

नियमांसहित इतर सर्व प्रकारची छाननी काळजीपूर्वक करावी व 'अँटि-मनी लाँडरिंग' नियमांचे पालन करावे.

ही योजना ताबडतोब सुरु केली जात आहे.

**अजित प्रसाद**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/९४२**